# <u>प्रेसनोट</u>

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. ११/१२/२०१८

## चतुःश्रृंगी वाहतूक विभाग, पुणे शहर येथील पोलीस नाईक कर्मचाऱ्यास चारशे रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांचे ड्रायव्हिंग लायसन्स सस्पेंड न करण्यासाठी चतुःश्रृंगी वाहतूक विभाग, पुणे शहर येथे नेमणूकीस असलेले पोलीस नाईक चंद्रकांत रासकर यांनी तक्रारदार यांना पाचशे रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची आज दिनांक ११/१२/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक चंद्रकांत रासकर नेमणुक चतुःश्रृंगी वाहतूक विभाग, पुणे शहर याने तक्रारदार यांचे ड्रायव्हिंग लायसन्स सस्पेंड न करण्यासाठी पाचशे रूपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन आज दिनांक ११/१२/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक चंद्रकांत माणिक रासकर, वय ३८, पोलीस नाईक ब.नं.२६०९, नेमणुक चतुःश्रृंगी वाहतूक विभाग, पुणे शहर याने तक्रारदार यांचेकडून ५००/- रूपयांची लाचेची रक्कम मागणी करून तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडून ४००/- रूपयांची लाच रक्कम जे.डब्ल्यु.मेरीएट चौक, सेनापती बापट चौक, पुणे येथे स्विकारल्यावर त्याला रंगेहात पकडण्यात आले असुन त्याचेवर चतुःश्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपंर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**

सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.